admn 19-20


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER कृषि परिषद

MCAER कृषि परिषद २००८-२००९

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com संकेतस्थळ : www.mcaer.org दूरध्वनी (०२०) २५५२८६८८


वाचाः- कृषी परिषद कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. मकृप/शिक्षण/१११९/१८५३/२०१९ दि. ९/८/२०१९

-------------------

जा.क्र. मकृप/शिक्षण-१/१११९/ १९५७ दि.२८ ऑगस्ट,२०१९

## परिपत्रक

विषयः- पदवी प्रवेश प्रक्रिया २०१९-२०
जागेवरील प्रवेश फेरींतर्गत दिनांकनिहाय गुणांमध्ये सुधारणा करणेबाबत.

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमाच्या नियोजित प्रवेश वेळापत्रकानुसार दि. ०३ ते ०७ सप्टेंबर,२०१९ या कालावधीत जागेवरील प्रवेश फेरी राबविण्यात येणार आहे. यामध्ये प्रत्येक दिवशीच्या प्रवेश प्रक्रियेकरिता किमान गुण निश्चित करण्यात आलेले आहे. पहिल्या दिवशी 'किमान ६० गुण व त्यापेक्षा जास्त' गुणधारकांकरिता प्रवेश आहेत. तथापि, सदर गुणांमधील उमेदवारांची संख्या मोठया प्रमाणात आहे. यामुळे पहिल्या दिवशी प्रवेश प्रक्रियेस विलंब होऊन प्रवेश प्रक्रिया सुरळीत होण्यास अडचणी निर्माण होतील. जागेवरील प्रवेश फेरीच्या चार दिवसांमध्ये समान विद्यार्थी संख्या असावी, या दृष्टिकोनातून जागेवरील प्रवेश फेरींचे वेळापत्रक खालीलप्रमाणे सुधारीत करण्यास राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने मान्यता प्रदान केलेली आहे.

| दिनांक | अंतिम गुणवत्ता यादीतील यादीतील पर्सेंटाईल / टक्केवारी (इतर अधिभारासह) | |
|---|---|---|
| | सध्याचे गुण | सुधारीत गुण |
| दि.०३/०९/२०१९ | ६० व त्यापेक्षा अधिक | ९० व त्यापेक्षा अधिक |
| दि.०४/०९/२०१९ | ५० व त्यापेक्षा अधिक | ७५.०० ते ८९.९९९९९९ |
| दि.०५/०९/२०१९ | ४० व त्यापेक्षा अधिक | ५०.०० ते ७४. ९९९९९९ |
| दि.०६/०९/२०१९ | सर्व पात्र उमेदवार (जागांच्या रूपांतरासह) | ५०.०० च्या खालील सर्व पात्र उमेदवार. |
| दि.०७/०९/२०१९ | --- | सर्व पात्र उमेदवार (जागांच्या रूपांतरासह) |

वरील कालावधीत प्रवेश फेरीचे आयोजन खालीलप्रमाणे असेल.

| अ.क्र. | वेळ | तपशील |
|---|---|---|
| १. | १०.०० वा. ते १२.०० वा. | प्रवेश जागेवर प्रवेश प्रक्रिया नोंदणी. |
| २. | १२.३० वा. ते ०२.३० वा. | जागेवर प्रवेश प्रक्रियेची सुरुवात. |
| ३. | ०२.३० वा. ते ३.०० वा. | भोजन वेळ (Lunch Break) |
| ४. | ३.०० पासून पुढे | त्या दिवशी उपस्थित उमेदवारांचे प्रवेश संपेपर्यंत. |

Scanned by CamScanner

admn 19-20

यास्तव जागेवरील प्रवेश फेरीद्वारे प्रवेश घेण्यास पात्र असलेल्या सर्व उमेदवारांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, त्यांनी आपले गुण विचारात घेऊन गुणांनुसार ठरविण्यात आलेल्या योग्य त्या दिनांकास आवश्यक ती मूळ कागदपत्रे व शुल्कासह प्रवेश प्रक्रिया केंद्रात विहित वेळेत उपस्थित रहावे. प्रवेश प्रक्रिया केंद्रांबाबतचा तपशील प्रवेश माहिती पुस्तिकेसोबतच्या 'परिशिष्ट जी' येथे नमूद करण्यात आलेला आहे.

**(व्ही. व्ही. माने भा प्र से)**
**महासंचालक**

प्रत माहिती व कार्यवाहीसाठीः-

१. मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., तिसरा मजला, गोपाळ हाऊस, हॉटेल किमयाजवळ, कर्वे रोड, कोथरुड, पुणे
यांना सूचित करण्यात येते की, सर्व पात्र उमेदवारांना अवगत होण्याकरिता सदरचे परिपत्रक संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावे. तसेच पात्र उमेदवारांना भ्रमणध्वनी संदेशाद्वारे अवगत करण्यात यावे.

२. मे. टेकनिक आयटी सोल्यूशन, लाईफ स्क्वेअर सोसायटी, ए ३०१, लोहगाव, पुणे ४७
यांना सूचित करण्यात येते की, सदरचे परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावे.

३. सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य, कृषी विद्यापीठांतर्गत व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांची सर्व महाविद्यालये.
यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सुधारीत वेळापत्रकानुसार प्रवेश प्रक्रिया करावी.

३. कुलसचिव, महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी, जि.अहमदनगर / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत माहितीसाठीः-

मा. आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, ८ वा मजला, न्यु एक्सेसर बिल्डींग, ए. के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१.

Scanned by CamScanner